| MHOS090025962025 | दाखल दिनांक | :- | १०/१२/२०२५ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | १७/१२/२०२५ | | |
| | निकाल दिनांक | :- | ०२/०७/२०२६ | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०० | ०६ | १५ |

**भाग अ**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(i) अन्वये]**

**न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, (न्यायालय क्र.३) कळंब, ता. कळंब,**

**जि. धाराशिव यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी - अमृता धोंडीराम जाधव)**

न्यायनिर्णय घोषित दिनांक ०२/०७/२०२६

| | |
|---|---|
| सं. फौजदारी खटला क्र. ८५७/२०२४ | निशाणी क्र.११ |
| गुन्हा नोंदणी क्रमांक – २९३/२०२५ | राज्य उत्पादन शुल्क, धाराशिव |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासनातर्फे,<br>दुय्यम निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क,<br>धाराशिव, ता. जि. धाराशिव. |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | श्री. एस. टी. वैदय |
| **विरुध्द** | |
| आरोपी | उत्तरेश्वर रामा जाधवर,<br>वय ३२ वर्षे,<br>रा. ताडगाव, ता. कळंब<br>जि . धाराशिव |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. बी. एच. वाघमोडे |

## भाग ब

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(ii)अन्वये]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०६/१०/२०२५ |
| गुन्हा दाखल दिनांक | ०६/१०/२०२५ |
| दोषारोप दाखल दिनांक | १०/१२/२०२५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०९/०१/२०२६ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १६/०१/२०२६ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०२/०७/२०२६ |
| दोषी ठरवल्याचा दिनांक, जर असल्यास | -निरंक- |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनवर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | उत्तरेश्वर रामा जाधवर, | ०६/१०/२५ | ०६/१०/२५ रोजी बीएनएनएस कलम ३५ (३) प्रमाणे नोटीस | महा. दारु बंदी कायदा कलम ६५(ई) | निर्दोष | -निरंक- | -निरंक- |

## भाग क

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(iii) अन्वये]

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | पद्माकर बलभीम जाधवर | घटनास्थळ पंच | नि. ९ |
| २. | रामराजे प्रताप यादव | घटनास्थळ पंच | नि. १० |

## ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

**गुन्हाः-** महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) अन्वये.

## न्यायनिर्णय

(जाहीर दिनांक – ०२ जुलै, २०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) अन्वये दाखल करण्यात आलेला आहे.

### सरकार पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः-

**२.** दिनांक ०६/१०/२०२५ रोजी फिर्यादी एम. आर. पातकळ, जवान, दु. राज्य उत्पादन शुल्क, धाराशिव, श्री. यु. व्ही. रामगुडे, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, धाराशिव यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, कळंब लातूर रोडलगत, हॉटेल श्री., ताडगाव, ता. कळंब, जि. धाराशिव येथे बेकायदेशीर एक इसम गावठी हातभट्टी देशी व विदेशी दारुची विक्री होते. त्यावरुन रेडींग स्टाफ आणि पंचांसह त्यांनी बातमीच्या ठिकणी अचानपणे छापा मारला असता तेथे आरोपी मिळुन आला व त्याच्या ताब्यातुन एका प्लास्टीकच्या कॅंडमध्ये ७० लिटर गा.ह.भ. दारु किंमत रक्कम रु.७,२००/- मिळुन आली. जप्त मुद्देमालातुन एका १८० मि.ली. क्षमतेच्या काचेच्या बाटलीमध्ये सी.ए. कामी रितसर नमुना काढुन घेण्यात आला. त्यानंतर त्यांनी आरोपीविरुद जागीच गुन्हा नोंद केला.

**३.** सदर फिर्यादीप्रमाणे गुन्हा र. क्र. २९३/२०२५ नोंद झाला. तपासी

अधिकारी यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा तयार केला व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तसेच तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** आरोपीवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५(ई) प्रमाणे निशाणी ८ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. आरोपीला दोषारोपाचा तपशील समजावून सांगितला. वरील निवेदनाप्रमाणे त्याने गुन्हा कबुल न करता प्रकरण चालविण्याचे स्विकारले.

**५.** सरकार पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी दोन पंच साक्षीदारांना तपासण्यात आले. त्यानंतर निशाणी क्र. १ वरील आदेशानुसार सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द पुरावा मिळून न आल्यामुळे त्यांचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आलेला नाही. याउलट, आरोपीच्या वतीने कोणताही पुरावा दाखल करण्यात आला नाही.

**६.** सरकार पक्षाची कथने व आरोपीचा बचाव पाहता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांचे निष्कर्ष त्यावरील कारणमिमांसेसह खालीलप्रमाणेः-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०६/१०/२०२५ रोजी मौजे ताडगाव, ता. कळंब, जि. उस्मानाबाद येथील श्री हॉटेल येथे एका प्लास्टीकच्या कॅंडमध्ये ७० लिटर गावठी हातभट्टी दारु किंमत रक्कम रू.७,२००/- किंमतीचा माल आरोपी आर्थिक फायद्यासाठी विनापास परवाना बेकायदेशिररित्या चोरटा विक्री व्यवसाय करण्याचे उद्देशाने बेकायदेशीर मिळून आले हे सिध्द केले आहे काय ? | नाही |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ साठीः-**

**७.** आरोपीतर्फे विधिज्ञ व सरकार पक्षातर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी गुणदोषावर न्यायनिर्णय करणेबाबत युक्तीवाद केला.

**८.** सरकार पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी दोन साक्षीदारास तपासण्यात आले. साक्षीदार क्र. १ यांच्या साक्षीत असे कथन केले की, त्यांना दिनांक ०६/१०/२०२५ रोजी पोलीसांनी पंचनाम्याकरीता बोलावले नव्हते. पंचनाम्यावर अनु.क्र.१ वर त्यांची सही आहे. परंतु, पंचनाम्यातील मजकुर त्यांना माहीती नाही. ते शेतात जात असताना पोलीसांनी त्यांची सही घेतली होती. साक्षीदाराने सरकार पक्षास पाठींबा दिला नाही. त्यांना सरकार पक्षातर्फे उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. तथापी, त्यातुन काहीही निष्पन्न झाले नाही.

**९.** साक्षीदार क्र. १ यांच्या साक्षीत असे कथन केले की, त्यांना दिनांक ०६/१०/२०२५ रोजी पोलीसांनी पंचनाम्याकरीता बोलावले नव्हते. पंचनाम्यावर अनु.क्र.२ वर त्यांची सही आहे. परंतु, पंचनाम्यातील मजकुर त्यांना माहीती नाही. ते रांजणीला जात असताना पोलीसांनी त्यांची सही घेतली होती. साक्षीदाराने सरकार पक्षास पाठींबा दिला नाही. त्यांना सरकार पक्षातर्फे उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. तथापी, त्यातुन काहीही निष्पन्न झाले नाही.

**१०.** प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपी हा विनापरवाना बेकायदेशीररित्या उक्त नमुद गा.ह.भ. दारु कब्जात बाळगुन तिचा चोरटा विक्री व्यवसाय करीत असताना मिळून आला हे निःसंशयपणे सिध्द करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात दोन्ही घटनास्थळ व जप्ती पंचांनी सरकार पक्षास पाठींबा न दिल्याने सरकार पक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करण्यास असमर्थ ठरला. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून जप्त केल्याची बाब संशयापलीकडे सिध्द करणेकामी अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. त्याचप्रमाणे, प्रकरणातील फिर्यादी व इतर महत्वपुर्ण

साक्षीदारांचा पुरावा नोंदविण्याकामी अपयशी ठरलयामुळे फिर्याद सिध्द होवु शकलेली नाही. तसेच, प्रस्तुत प्रकरणामध्ये सी.ए. अहवाल दाखल नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा दारुच होता याबाबत देखील संशय निर्माण होत आहे. त्यामुळे आरोपीविरूध्दचा दोषारोप संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. म्हणून मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ साठीः-**

**११.** एकंदर, मुद्दा क्र. १ वरील कारणमिमांसा व निष्कर्ष बघता अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द केले नसल्याने आरोपीस निर्दोष मुक्त करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल. मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१) आरोपी उत्तरेश्वर रामा जाधवर, वय ३२ वर्षे, धंदा - मजुरी, रा. ताडगाव, ता. कळंब, जि. धाराशिव यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम २७८ (१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वयेच्या दंडनीय अपराधातून संशयाचा फायदा देऊन मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका रद्द करण्यात येतो.

३) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ च्या पुर्ततेकामी रक्कम रुपये १५,०००/- चा वैयक्तिक जातमुचलका दाखल करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

**स्वाक्षरीत/-**

**( अमृता धोंडीराम जाधव)**
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
(न्यायालय क्र.३),कळंब.

**ठिकाण** - कळंब
**दिनांक** - ०२/०७/२०२६

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | -- | Prashant Sunita S. Ovhal, Stenographer (Grade-III) |
| Name of the Court | -- | In the Court of 3rd Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C. Kallam. |
| Date of dictation | -- | 02/07/2026. |
| Order signed by the Presiding Officer on | -- | 02/07/2026. |
| Order uploaded on | -- | 02/07/2026. |